

# श्री शंकर महाराज आरती-अज्ञानतमे गिळिले ज्ञान तेजाला

https://www.chalisa.online

श्री शंकरमहाराज आरती

।। ॐ दीनानाथ गुरू माऊली ।।

अज्ञानतमे गिळिले ज्ञान तेजाला ।
अहंकारे धर्म समूळ बुडवीला ।
त्राहि त्राहि एकचि आरोळा झाला ।
दिनोध्दारणा लागी अवतार झाला ।
जयदेव जयदेव सद्गुरू अवतारा, श्री दत्तावतारा ।
तारक तू आम्हासी, तारक तू सकलासी, शंकर दातारा ।।१।।

पुराणपुरूषा सकल धर्म आचार्या ।
सुरवर मुनिजन सर्वा एकचि गुरूवर्या ।
पांडुरंगा आदिनाथा गुरू दत्तात्रेया ।
अपार नामे नटला चालवी निजकार्या ।
जयदेव जयदेव सद्गुरू अवतारा, श्री दत्तावतारा ।
तारक तू आम्हासी, तारक तू सकलासी, शंकर दातारा ।।२।।

त्रिविधा गुण कर्माचे सूत्र तव अधिन ।
तिन्ही लोकांवरती सत्ता पूर्ण |
शरणागत कैवारी भवभय संहरण |
नारायणा नित्य दाखवी तव चरण ।
जयदेव जयदेव सद्गुरू अवतारा, श्री दत्तावतारा ।
तारक तू आम्हासी, तारक तू सकलासी, शंकर दातारा ।।३।।

सिध्दयोगी डॉ. श्री दा. ना. धनेश्वर यांनी गायलेली

|| https://www.chalisa.online ||